**अनुसुचित जमातीची जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्याची सुधारित कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एसटीसी 1696/प्र.क्र.34/का.10
मंत्रालय विस्तार, मुंबई–400 032.
दिनांक : 7 मार्च, 1996.

<u>वाचा</u> :–

(1) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक : सीबीसी–1077 / 50876 / डी–5, दिनांक 21 मार्च, 1979.

(2) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक : सीबीसी 1680 / 43669 / डी–5, दिनांक 25 जुलै, 1980.

(3) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक : सीबीसी–1680 / 43669 / डी–5, दिनांक 29 ऑक्टोबर, 1980.

(4) सह सचिव, कल्याण मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक : 12018 / 13 / 95–एससीडी / आर–सेल, दिनांक 25 सप्टेंबर, 1995.

<u>प्रस्तावना</u> :– मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक : 14767/93, सिव्हील अर्ज क्रमांक–5854/94, कुमारी माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर यावर दिनांक 2 सप्टेंबर, 1994 रोजी असा निर्णय दिला आहे की, **"प्रत्येक राज्याने जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्याची कार्यपध्दती सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहित करण्यात यावी"** मा.सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त विशेष अनुज्ञा याचिकेच्या निर्णयामध्ये घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचना व केंद्रीय कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या प्रस्तावनेतील क्रमांक–4 येथील दिनांक 25 सप्टेंबर, 1995 च्या पत्रान्वये केलेल्या सूचना विचारात घेऊन प्रस्तावनेतील क्रमांक–3 येथील दिनांक 29 ऑक्टोबर, 1980 च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्याबाबत विहित केलेल्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u>** :–शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक : सीबीसी–1680 / 43669 / डी–5, दिनांक 29 ऑक्टोबर, 1980 अन्वये अनुसूचित जमातीची जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्याच्या विहित केलेल्या कार्यपध्दतीत फेरबदल करुन शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :–

2. अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना जातीची प्रमाणपत्रे या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट **"अ"** मध्ये नमूद केलेल्या सूचनांनुसार निर्गमित करावीत.

(.......2/–)

3. खाली नमूद केलेल्या अधिका–यांना अनुसूचित जमातीची जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्यासाठी **"सक्षम अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(1) संबंधित उप विभागीय अधिकारी (महसूल)

(2) उप जिल्हाधिकारी,

**किंवा**

(3) संबंधित जिल्हाधिकारी

जिल्हाधिका-यांनी प्रशासकीय दृष्टया प्रमाणपत्राच्या कामाची वाटणी उप जिल्हाधिकारी आणि उ.वि.अ.(महसूल) मध्ये करावी.

4. जातीचे प्रमाणपत्र घेणा–या अनुसूचित जमातीच्या व्यक्तीने सक्षम अधिका–यांकडे सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

5. एखादी व्यक्ती अनुसूचित जमातीची नसूनही त्या व्यक्तीस अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, याबद्दलच्या कोणत्याही तक्रारीची, जाती प्रमाणपत्र तपासणी समिती ज्या क्षेत्रातील असेल ती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती संबंधित दक्षता पथकामार्फत अशा तक्रारीची चौकशी करील व अशी तक्रार प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्यावर सहा महिन्याच्या आत निर्णय घेईल. जाती प्रमाणपत्र तपासणी समितीचा निर्णय अंतिम राहील.

6. अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना जातीची प्रमाणपत्रे निर्गमित करण्याबाबतचे यापूर्वी निर्गमित केलेले सर्व आदेश अधिक्रमित करण्यात येत आहेत.

7. वरील आदेश तात्काळ लागू करण्यात येत आहेत. तसेच या आदेशांचे व सूचनांचे अनुपालन काटेकोरपणे करण्याबाबतची दक्षता सर्व सक्षम अधिका–यांनी घ्यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

राजेंद्र सिंह

**( राजेंद्र सिंह )**
सचिव,
आदिवासी विकास विभाग.

**प्रति,**

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर.
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी.

परिशिष्ट – "अ"

## अनुसूचित जमातींना जातीचे प्रमाणपत्रेदेण्याबाबत सूचना

(1) ज्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्राची जरुरी असेल त्याने खालीलपैकी कोणत्याही अधिका–याकडे विहित केलेल्या व सोबत जोडलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावा. ( अर्जाचा नमुना पृष्ठ 13–14 )

(1) संबंधित उप विभागीय अधिकारी (महसूल).

(2) उप जिल्हाधिकारी

किंवा

(3) संबंधित जिल्हाधिकारी

जिल्हाधिका–यांनी प्रशासकीय दृष्ट्या प्रमाणपत्राच्या कामाची वाटणी उप जिल्हाधिकारी आणि उप विभागीय अधिकारी (महसूल) मध्ये करावी.

(2) आपण अर्जात दिलेली माहिती खरी आहे व ही माहिती खोटी असल्याचे नंतर आढळून आल्यास आपण शासनास खोटी माहिती दिलीम्हणून "इंडियन पिनल कोड" मधील कलम 199 व 200 मधील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र होऊ असे अर्जदाराने अर्जात स्पष्टपणे नमूद केले पाहिजे.

(3) अर्जदार हा संबधित गावाचा कायम रहिवाशी आहे असे त्याने अर्जात स्पष्टपणे नमूद केले पाहिजे व त्याबद्दलचा कागदोपत्री पुरावा सादर केला पाहिजे.तसेच अर्जदाराचे आई–वडील, पालक किंवा स्वतः अर्जदार यांनी प्रतीज्ञालेख सादर करावा की, ज्या प्रतिज्ञालेखामध्ये रहिवासाचे मूळ ठिकाण, जात–उपजात, आदिवासी जमातीचा घटक इ.तपशील असावा व सदरहू प्रतिज्ञालेख राजपत्रित अधिकारी किंवा अराजपत्रित अधिकारी यांच्या सही–शिक्क्यानिशी साक्षांकित केलेला असावा.

(4) अर्जदाराचे वडील किंवा इतर जवळचे नातेवाईक शासकीय किंवा तत्सम सेवात असतील किंवा पूर्वी असतील तर त्याच्या सेवा पुस्तकातील जात व कायम रहिवासाचे ठिकाण या संबंधीच्या नोंदीची सत्य प्रत अर्जदाराने अर्जासोबत जोडली पाहिजे.

(5) अर्जदार हा अर्जात नमूद केलेल्या जमातीचाच आहे ह्याबाबत त्याने सबळ पुरावा सादर केला पाहिजे.

(6) अर्जदाराने एखाद्या सक्षम अधिका–याकडे जातीच्या प्रमाणपत्राकरता पूर्वी अर्ज केला असेल किंवा सक्षम अधिका–याने ( महाराष्ट्रातील किंवा इतर राज्यातील ) त्यास जातीचे प्रमाणपत्र दिलेले असेल तर त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावयास पाहिजे व अशा प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडली पाहिजे.

(चेकलीप पृष्ठ9 प्रमाणे)

(7) सक्षम अधिका–याने सोबत जोडलेल्या तपासणी यादीच्या सहाय्याने अर्जाची छाननी करावी व अर्जदार त्या जमातीचाच आहे याची खात्री करुन घेतली पाहिजे. सक्षम अधिका–याने अर्जदार हा नमूद केलेल्या जमातीचाच आहे किंवा नाही हे ठरविण्याकरिता विचारात घेतलेल्या पुराव्याची नोंद तपशीलवार ठेवली पाहिजे. तसेच ज्या कारणाने अर्ज मान्य केला किंवा नाकारला त्याची कारणे, परावा व निर्णय स्पष्टपणे नमूद केला पाहिजे ––

(ब) अर्जावर अंतिम निर्णय देण्यापूर्वी अर्जदाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती, सक्षम अधिका-याने मूळ कागदपत्राबरोबर तपासून पाहिल्या पाहिजेत.

(8) सर्वसाधारणपणे जातीची नोंद शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रात केलेली असते. अर्जदाराने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जदार हा तो शिकत असलेल्या शेवटच्या शाळेच्या ( विशेषतः प्राथमिक शाळेच्या ) शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रात नमूद केलेल्या जातीचाच आहे अशी सक्षम अधिका-याची खात्री झाली तर अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

(9) अर्जदाराने अर्जात दिलेल्या जातीच्या खरेपणाबद्दल सक्षम अधिका-याची खात्री झाली नसेल तर अर्ज नाकारण्यात यावा व अर्ज नाकारण्याची कारणे अर्जदारास कळविण्यात यावी. नाकारण्यात आलेल्या अर्जासंबंधी कोणत्याही प्राधिका-याकडे दावा किंवा अपिल करता येणार नाही.

(10) सक्षम अधिका-याने अर्जदाराच्या नातेवाईकांची कागदोपत्री नमूद केलेली जात उदा. महसूल विभागाच्या दप्तरातील महसूली किंवा जन्म-मृत्युच्या नोंदी विचारात घ्याव्यात.

(11) सक्षम अधिका-यांना त्यांच्या अधिकारी क्षेत्रात कायम रहिवासी असणा-यांनाच जातीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे. कायम रहिवास म्हणजे जो रहिवास सेवा, नोकरी, शिक्षण, धंदा, जेल इत्यादी कारणांकरिता नसलेला रहिवास.

(12) महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत अर्जदाराच्या जमातीचा समावेश असल्याशिवाय व अर्जदार हा त्या ठिकाणचा कायम रहिवासी असल्याशिवाय अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या क्रमांक – बीसी 12025/76 एससीटी-1, दिनांक 22 मार्च, 1977 च्या पत्रात दिलेल्या सूचना काळजीपूर्वक पाळण्यात याव्यात. ( प्रत सोबत जोडली आहे, पृ. 10 प्रमाणे )

(13) केंद्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यातच जातीचे प्रमाणपत्र दिले पाहिजे. या प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे. या नमुन्याच्या प्रती कार्यालयाने छापून घ्याव्यात. अशासकीय संस्थांनी किंवा व्यक्तींनी छापलेले नमुने कोणत्याही परिस्थितीत वापरण्यात येऊ नयेत. संबंधित कार्यालयाने प्रत्येक छापील प्रमाणपत्रास मोठ्या अंकात अनुक्रमांक ठळकपणे द्यावा. (पृ. 11 प्रमाणे)

(14) जमातीचे वर्गीकरण व जात बरोबर लिहावी. महाराष्ट्र राज्याकरता असलेली अनुसूचित जमातीची यादी केंद्र शासनाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 342 व त्यानुसार काढलेल्या अध्यादेश 22 प्रमाणे विहित करण्यात आली आहे.

(15) अनुसूचित जमातीच्या व्यक्तीचा धर्म कोणताही असू शकतो.

... 7/-

(16) एका राज्यातून दुस–या राज्यात स्थलांतर करणारी व्यक्ती ही ज्या राज्यातून तिने स्थलांतर केले आहे त्या राज्याच्या संदर्भातच अनुसूचित जमातीची समजली पाहिजे. सक्षम अधिका–यांनी एका राज्यातून दुस–या राज्यात स्थलांतरित असलेल्या व्यक्तीस, त्यांच्या वडिलांना त्यांच्या मूळ राज्यातील सक्षम अधिका–याने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर ज्या प्रकरणात मूळ राज्यामार्फत चौकशी करणे आवश्यक आहे, अशी प्रकरणे वगळून इतर प्रकरणामध्ये जातीची प्रमाणपत्रे द्यावीत. स्थलांतरितांना जातीचे प्रमाणपत्र घेण्यासाठी त्यांना त्यांच्या मूळ राज्यात जावे लागू नये व ते ज्या राज्यात स्थलांतरित झाले आहेत त्या राज्यातच त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळावे याउद्‌देशाने ही सवलत देण्यात आलेली आहे. स्थलांतरित झालेल्यांना महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीसाठी असलेल्या सवलती सदरहू जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे मिळणार नाहीत.

(17) ज्या जातीच्या प्रमाणपत्रात संबंधित जातीचे चुकीचे वर्गीकरण नमूद केले असेल, किंवा शासकीय आदेश बरोबर नमूद केले नसतील किंवा जे विहित नमुन्यात नसतील, ती प्रमाणपत्रे ग्राह्य मानण्यात येणार नाहीत. ज्या अधिका–यांकडून अशी प्रमाणपत्रे देण्यात येतील त्यांचेवर उचित कार्यवाही करण्यात येईल. याबाबतीत शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक : सीबीसी 1476 / 11027 /का.5, दिनांक 5 मे, 1976 कडे सक्षम अधिका–यांचे लक्ष वेधण्यात येत आहे ( प्रत सोबत जोडली आहे पृ. 12 प्रमाणे )

(18) एखादी व्यक्ती अनुसूचित जमातीची नसूनही त्या व्यक्तीस अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, याबद्‌दलच्या कोणत्याही तक्रारीची जाती प्रमाणपत्र तपासणी समिती ज्या क्षेत्रातील असेल ती तपासणी समिती संबंधित दक्षता पथकामार्फत तक्रारीची चौकशी करील व अशी तक्रार आल्यापासून सहा महिन्याचे आत त्यावर निर्णय देईल. तपासणी समितीने दिलेला निर्णय अंतिम राहील. सदरहू निर्णय ज्या सक्षम अधिका–याने जातीचे प्रमाणपत्र दिले आहे त्यास कळविण्यात येईल. सक्षम अधिकारी संबंधित प्रमाणपत्र रद्द करण्याची कार्यवाही तात्काळ करील, तसेच संबंधित अर्जदाराविरुध्द उचित कारवाई देखील करील.

(19) ज्या सक्षम अधिका–याने संबंधित अर्जदारास चुकीचे जातीचे प्रमाणपत्र दिले असेल त्या अधिका–या–विरुध्द इंडियन पीनक कोड व उचित सेवा नियमानुसार कारवाई तात्काळ करण्यात येईल.

(20) संबंधित महिन्यात दिलेल्या जातीच्या प्रमापत्राची माहिती पुढील महिन्याच्या 5 तारखेच्या आत त्यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्याची काळजी संबंधित सक्षम अधिकारी घेतील.

( 8..../-

(21) सक्षम अधिका-यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची नोंद वेगळ्या रजिस्टरमध्ये खाली दिलेल्या नमुन्यात ठेवावी :-

| क्रमांक | तहसिल | ज्या व्यक्तीस जातीचे प्रमाण-पत्र दिले आहे त्या व्यक्तीचे नांव | संपूर्ण पत्ता | जमातीचे नाव | अनुसूचित जमातीच्या यादीतील क्रमांक | प्रमाणपत्र दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |

या रजिस्टरचा मागील महिन्याचा उतारा दर महिन्याच्या 5 तारखेच्या आत पुढीलप्रमाणे संबंधित सक्षम अधिका-यांकडे पाठवावा :-

| क्रमांक | सक्षम अधिकारी | प्रती ज्यास पाठवावयाच्या त्या अधिका-याचे नाव. |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| (1) | उप विभागीय अधिकारी. (महसूल) | (1) संबंधित तहसिलदार.<br>(2) जिल्हाधिकारी.<br>(3) संबंधित ग्रामपंचायत.<br>(4) संबंधित आदिवासी विकास सहकारी सोसायटी. |
| (2) | उप जिल्हाधिकारी किंवा संबंधित जिल्हाधेकारी | (1) उप विभागीय अधिकारी(महसूल),<br>(2) जिल्हाधिकारी<br>(3) संबंधित ग्राम पंचायत.<br>(4) संबंधित आदिवासी विकास सहकारी सोसायटी.<br>(5) संबंधित तहसिलदार. |

वर नमूद केलेले सक्षम अधिका-यांनी ठेवावयाचे जातीच्या प्रमाणपत्राचे रजिस्टर हे सामान्य जनतेस तपासणी करण्यास उपलब्ध राहील व त्याकरिता कोणतीही **फी** आकारण्यात येणार नाही.

00------------------00

**(Check Slip)**

**Through**

| | |
|---|---|
| **(1) Verified that the family of the applicant is the permanent resident of the hamlet/village/town/city, which comes in the jurisdiction of the competent authority.** | **Name of village officer or any person authorised by him.** |
| **(2) Satisfied himself from the relevant documents/information that such a tribe is *found* in the jurisdiction of the authority.** | |
| **(3) Satisfied himself that the applicant is not taking undue advantage of the similarity in the nomenclature of his non-notified tribe with that of a notified scheduled tribe or of such identity in the name from the category of notified backward classes to the other.** | **To be verified from elderly persons of other castes from the same village.** |
| **(4) Has he taken necessary precautions to see that the applicant really belongs to the notified scheduled tribe group and is positively of the same group of the area where these were notified prior to 27th July 1977 and is not taking undue advantage of the provision of the removal of the area restrictions. (This should be particularly seen where there is similarity of names as per list).** | |

(G.C.P.) HK 3243—2(1200—4-87)

(....10/–)

क्रमांक बीसी.१२०२५/२/७६/एससीटी-१

**भारत सरकार**

**गृह मंत्रालय**

सर्व राज्य शासनांच्या/संघशासित प्रदेश प्रशासनांच्या मुख्य सचिवांना
नवी दिल्ली ११० ००१, दिनांक २२ मार्च १९७७/चैत्र, १८९९

**विषय.---अनुसूचित जातींची/अनुसूचित जमातींची प्रमाणपत्रे देण्यासंबंधी खुलासा**

महोदय,

मला आपणास असे कळवण्याचा निदेश आहे की, एखादी व्यक्ती एखाद्या विवक्षित अनुसूचित जातीची/जमातीची असल्याबद्दल दिली जाणारी प्रमाणपत्रे ही अशी प्रमाणपत्रे देण्याच्या तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करून दिली जात नसल्याची कित्येक उदाहरणे या मंत्रालयाच्या पाहण्यात आली आहेत. अशी प्रमाणपत्रे देण्याचा अधिकार बहाल करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना "वास्तव्य" या संज्ञेमागील संकल्पनेच्या कायदेशीर स्थितीची पुरेशी जाणीव नाही, हे बहुदा याचे कारण असावे.

२. संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व ३४२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे राष्ट्रपतींना, प्रत्येक राज्याच्या व संघशासित प्रदेशाच्या संबंधात विविध जाती व जमाती त्या त्या राज्यातील किंवा संघशासित प्रदेशातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती म्हणून अधिसूचित करणारे आदेश वेळोवेळी काढावे लागतात. असे जाहीर करावयाचे क्षेत्र एखादे राज्य असेल तर असे आदेश संबंधित राज्याच्या राज्यपालांशी विचारविनिमय करून काढण्यात येतात. राज्यांतर्गत क्षेत्राचे बंधन जाणूनबुजूनच घालण्यात आले आहे. हेतू हा की, त्या विशिष्ट क्षेत्राच्या हद्दीत राहणाऱ्या विशिष्ट समाजाच्या ज्या लोकांना अनुसूचित जातीचे किंवा अनुसूचित जमातीचे हा दर्जा मिळण्यास पात्र समजले गेले असेल त्यांनाच त्यांच्यासाठी देण्यात आलेल्या सवलतींचा लाभ मिळावा. एकाच जातीच्या परंतु वेगवेगळ्या राज्यात/संघशासित प्रदेशात राहणाऱ्या लोकांना एकाच प्रकारच्या निःसमर्थतेचा त्रास अपरिहार्यपणे सोसावा लागतो असे नसल्यामुळे, एकाच जातीच्या परंतु निरनिराळ्या राज्यांत/संघशासित प्रदेशात राहणाऱ्या दोन व्यक्तींपैकी दोघांनाही अनुसूचित जातीचे/जमातीचे किंवा त्याउलट कदाचित समजले जाणार नाही. हे शक्य आहे. म्हणून विवक्षित व्यक्तीच्या विवक्षित ठिकाणच्या वास्तव्याला महत्त्व प्राप्त होते. वास्तव्य या शब्दाचा अक्षरशः किंवा सर्वसामान्य अर्थ याठिकाणी अभिप्रेत नाही. उलट एखाद्या व्यक्तीची जात/जमात ही एखाद्या क्षेत्राच्या संबंधात अनुसूचित म्हणून जाहीर करणाऱ्या राष्ट्रपतींच्या आदेशाच्या अधिसूचनेच्या तारखेस त्या व्यक्तीच्या त्या क्षेत्रातील कायम वास्तव्याचाच बोध त्यावरून होतो. अशा प्रकारे एखाद्या व्यक्तीच्या प्रकरणी लागू होणाऱ्या राष्ट्रपतींच्या आदेशाच्या अधिसूचनेच्या वेळी ती व्यक्ती आपल्या कायम वास्तव्याच्या ठिकाणापासून काही काळाकरता तात्पुरती म्हणजे उदाहरणार्थ चरितार्थासाठी, शिक्षणासाठी वगैरे दूर गेली असेल आणि जर तिची जात/जमात तिच्या राज्याच्या/संघशासित प्रदेशाच्या संबंधात त्या आदेशात नमूद करण्यात आलेली असेल तर तिला देखील, असेल त्याप्रमाणे, अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची व्यक्ती समजता येईल. परंतु राष्ट्रपतींच्या कोणत्याही आदेशात त्या क्षेत्राच्या संबंधात तिच्या जातीच्या/जमातीच्या नावाचा अनुसूचित म्हणून उल्लेख केलेला आहे ही वस्तुस्थिती असली तरी तिच्या तात्पुरत्या वास्तव्याच्या ठिकाणाच्या संबंधात तिला अनुसूचित जातीची/जमातीची समजता येणार नाही.

३. कोणत्याही व्यक्तीच्या अशा कायम वास्तव्याच्या ठिकाणाच्या बाबतीत तसेच ती स्वतः ज्या जातीची/जमातीची असल्याचा दावा करीत असेल त्या जाती/जमातीच्या बाबतीतही खरेपणाविषयी खात्री करून घेण्याच्या हेतूनेच भारत सरकारने अशी प्रमाणपत्रे देण्यासाठी विहित केलेल्या नमुन्यात खास तरतूद केली आहे. केवळ पात्र व्यक्तींनाच अशी प्रमाणपत्रे दिली जावी या दृष्टीने, प्रामुख्याने महसुली अभिलेखाच्या आधारे व जरूर भासल्यास, अशी प्रमाणपत्रे देण्यापूर्वी विश्वसनीय चौकशी करून योग्य ती पडताळणी केली जाणे आवश्यक ठरते. महसूल अधिकाऱ्यांना संबंधित महसुली अभिलेख पाहता येणे तर शक्य असतेच शिवाय विश्वसनीय चौकशीसुद्धा त्यांनाच करता येते. त्यामुळे फक्त अशा अधिकाऱ्यांनी दिलेली प्रमाणपत्रेच सादर करण्यात यावी असा भारत सरकारचा आग्रह असतो. म्हणून अशी प्रमाणपत्रे देण्यास सक्षम ठरण्यासाठी, भारत सरकारचे (कर्मचारीवर्ग व प्रशासन सुधार विभाग) पत्र क्रमांक १३/२/७४-ईएसटी/(एससीटी), दिनांक ६ ऑगस्ट १९७५, (प्रत सोबत जोडली आहे) यामध्ये उल्लेख केलेला अधिकारी हा असा असला पाहिजे की, राष्ट्रपतींच्या संबंधित आदेशाच्या अधिसूचनेच्या वेळी प्रमाणपत्रासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीच्या कायम वास्तव्याचे ठिकाण ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्राशी त्याचा संबंध असला पाहिजे. म्हणजे असे की, एका जिल्ह्यातील महसूल अधिकारी हा दुसऱ्या जिल्ह्यातील व्यक्तीला असे प्रमाणपत्रे देण्यास सक्षम असणार नाही. त्याचप्रमाणे एका राज्यातील/संघशासित प्रदेशातील असा अधिकारी राष्ट्रपतींच्या एखाद्या विवक्षित आदेशाच्या अधिसूचनेच्या वेळी ज्यांचे कायम वास्तव्याचे ठिकाण वेगळ्या राज्यात/संघशासित प्रदेशात असेल अशा व्यक्तींना अशी प्रमाणपत्रे देऊ शकणार नाही. राष्ट्रपतींच्या संबंधित आदेशाच्या अधिसूचनेच्या तारखेनंतर जन्मलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, त्या व्यक्ती राष्ट्रपतींच्या आदेशाच्या ज्या अधिसूचनेच्या आधारे अनुसूचित जातीच्या/जमातीच्या असल्याचा दावा करीत असतील त्या अधिसूचनेच्या वेळी-त्यांच्या मातापित्यांच्या कायम वास्तव्याचे ठिकाण हे त्यांना अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या हा दर्जा देण्याच्या प्रयोजनासाठी त्यांच्या वास्तव्याचे ठिकाण असेल.

४. काही राज्य शासनांनी/संघशासित प्रदेश प्रशासनांनी आपल्या सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांना अशी प्रमाणपत्रे देण्याचा अधिकार बहाल केला आहे, असे समजते आणि महसूल अधिकारीसुद्धा राजपत्रित अधिकारी, खासदार व आमदार इत्यादींनी दिलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे प्रमाणपत्रे देतात. अशी प्रथा अनुसरली तर खोटी प्रमाणपत्रे दिली जाण्याचा उघड उघड धोका आहे. कारण खरेपणा पडताळून पाहण्याचे कोणतेही योग्य साधन नसल्यामुळे प्रमाणपत्रात नमूद केलेल्या वस्तुस्थितीच्या खरेपणाबद्दल हमी देणे अशा अधिकाऱ्यांना शक्य होणार नाही. खोटी प्रमाणपत्रे दिली जाण्यास प्रतिबंध व्हावा या दृष्टीने पडताळणीच्या प्रश्नाला आणखीनच महत्त्व प्राप्त होते.

५. म्हणून सर्व राज्य शासनांना/संघशासित प्रदेश प्रशासनांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी अशी प्रमाणपत्रे देण्याविषयीची आपापली कार्यपद्धती अशा प्रकारे विहित करावी की, ती वरील तसेच यापूर्वी वेळोवेळी दिलेल्या अनुदेशांनुरूप असेल. ज्याठिकाणी खासदार, आमदार, राजपत्रित अधिकारी इत्यादींनी दिलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे प्रमाणपत्रे देण्याचा अधिकार महसूल अधिकाऱ्यांना बहाल करण्यात आला असेल तेथेही त्यांनी योग्य ती पडताळणी केल्यानंतर आणि अशा प्रमाणपत्रांच्या अचूकतेबद्दल स्वतःची खात्री पटल्यानंतरच अशी प्रमाणपत्रे द्यावी.

आपला,

ओ. आर. श्रीनिवासन्,

अवर सचिव, भारत सरकार

—635— —607— 303— 344 64



**Form of Caste Certificate**

This is to certify that Shri/Shrimati/Kumari*.......................................... son/daughter* of .......................................... of village/town*............ .................................... in District/Division* .................................... of the State/Union Territory* .................................................... belongs to the .......................................................... Caste/Tribe* which is recognised as a Scheduled Caste / Scheduled Tribe* under:

*The Constitution (Scheduled Castes) Order, 1950.

*The Constitution (Scheduled Tribes) Order, 1950

*The Constitution (Scheduled Castes) Union Territories Order, 1951.

*The Constitution (Scheduled Tribes) Union Territories Order, 1951 [(as amended by the Scheduled Castes and Scheduled Tribes Lists (Modification) Order, 1956, the Bombay Reorganisation Act, 1960, the Punjab Reorganisation Act, 1966, the State of Himachal Pradesh Act, 1970, the North Eastern Areas (Reorganisation) Act, 1971 and the Scheduled Castes and Scheduled Tribes Orders (Amendment) Act, 1976)].

*The Constitution (Jammu and Kashmir) Scheduled Castes Order, 1956.

*The Constitution (Andaman and Nicobar Islands) Scheduled Tribes Order, 1959, as amended by the Scheduled Castes and Scheduled Tribes Orders (Amendment) Act, 1976.

*The Constitution (Dadra and Nagar Haveli) Scheduled Castes Order, 1962.

*The Constitution (Dadra and Nagar Haveli) Scheduled Tribes Order, 1962.

*The Constitution (Pondicherry) Scheduled Castes Order, 1964.

*The Constitution (Scheduled Tribes) (Uttar Pradesh), Order, 1967.

*The Constitution (Goa, Daman and Diu) Scheduled Castes Order, 1968.

*The Constitution (Goa, Daman and Diu) Scheduled Tribes Order, 1968.

*The Constitution (Nagaland) Scheduled Tribes Order, 1970.

2. Shri/Shrimati/Kumari .......................................................... and/or his/her family ordinarily reside(s) in village/town .............................. of .......................................... District/Division of the State/Union Territory of..................................................

Signature..............................

Designation..............................

Place............................ State / Union Territory

Date............................

*Please delete the words which are not applicable.

*Note.*—The term "ordinarily resides" used here will have the same meaning as in section 20 of the Representation of the Peoples Act, 1950,

**मागास वर्ग**

अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींच्या व्यक्तींना जातींची प्रमाणपत्रे देण्याबाबतच्या सूचना.

**महाराष्ट्र शासन**

**समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग**

परिपत्रक क्र. सीबीसी.-१४७६/११०२७-कार्यासन-पाच,
सचिवालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ मे १९७६.

पहा.--(१) शासकीय परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी. १४७५/१९६८९-कार्यासन-पाच, दिनांक १५ ऑक्टोबर, १९७५.

(२) गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. बीसी./१२०२५/३/७६, एससीटी-एक, दिनांक २९ मार्च १९७६.

**परिपत्रक**

जातींची प्रमाणपत्रे देण्याचा अधिकार बहाल करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी अशी प्रमाणपत्रे देण्यापूर्वी योग्य पडताळणी करावी आणि गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ५५/१/७२, आरयू (एससीटी-पाच), दिनांक २ मे १९७५ यामध्ये व शासकीय परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी. १४७५/४२०-कार्यासन-पाच दिनांक २३ सप्टेंबर १९७५ यामध्ये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे अशी विनंती त्या अधिकाऱ्यांना शासकीय परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी. १४७५/१९६८९-कार्यासन-पाच, दिनांक १५ ऑक्टोबर १९७५ अन्वये यापूर्वीच करण्यात आली आहे. गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी आपल्या पत्र क्र. बीसी १२०२५/३/७६, एससीटी-एक, दिनांक २९ मार्च, १९७६ अन्वये असे कळवले आहे की, जातींची प्रमाणपत्रे देण्याचा अधिकार बहाल केलेल्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याने निष्काळजीपणे आणि योग्य पडताळणी न करता प्रमाणपत्रे दिली असल्याचे आढळून आल्यास, त्यांना लागू असलेल्या समुचित शिस्तविषयक नियमांनुसार ते ज्या कारवाईस पात्र होतील त्याशिवाय त्यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या संबंधित तरतुदींखालीही कारवाई करण्यात येईल असे त्यांना कळवण्यात यावे. म्हणून शासनाची अशी इच्छा आहे की, ज्या अधिकाऱ्यांना जातीची प्रमाणपत्रे देण्याचा अधिकार बहाल करण्यात आला आहे त्यांनी भारत सरकारच्या २९ मार्च १९७६ च्या पत्रामधील मजकुराची काळजीपूर्वक नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ए. व्ही. वेलणकर,**
कक्ष अधिकारी.

(...13/-)

-437
-409
305



## अनुसूचित जमातींच्या प्रमाणपत्राकरता अर्जाचा नमुना

प्रति,

संबंधित उप विभागीय अधिकारी (महसूल), संबंधित उप जिल्हाधिकारी किंवा संबंधित जिल्हाधिकारी.

**विषय.—अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र**

महोदय,

मी खाली सही करणार .................................................. अर्ज करतो की, मला माझ्या साठी/माझ्या मुला-मुलींसाठी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची जरुरी असल्याने मी सदर अर्ज करीत आहे. सदर जातीचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून खालील माहिती सादर करीत आहे :—

(१) (अ) अर्जदाराचे संपूर्ण नाव .. ..
गावाचे नाव .. ..
तहसील .. ..
जिल्हा .. ..
पोस्टाचे नाव .. ..
(ब) सध्याचा व्यवसाय .. ..
(क) परंपरागत व्यवसाय .. ..

(२) (अ) वडिलांचे संपूर्ण नाव .. ..
संपूर्ण पत्ता .. ..
(वडील ह्यांत नसल्यास त्यांच्या शेवटच्या ठिकाणाचा पत्ता द्यावा.) ..
(ब) सध्याचा व्यवसाय .. ..
(क) परंपरागत व्यवसाय .. ..

(३) (अ) अनुसूचित जमात .. ..
पोटजात .. ..
(ब) मातृभाषा .. ..
बोलीभाषा .. ..

(४) ज्या व्यक्तीकरता जातीचे प्रमाणपत्र हवे आहे त्या व्यक्तीची माहिती—
(अ) त्या व्यक्तीचे मूळ गांव ..
(ब) मूळ गावापासून दुसऱ्या गावी सदर व्यक्ती रहात असल्यास त्या गावाचे नाव.
(क) मूळ गाव सोडल्याचे वर्ष ..
(ड) मूळ गाव सोडण्याची कारणे. उदा. शिक्षण, नोकरी इ. .. ..
(इ) सध्याच्या गावी रहाण्याची कारणे. उदा. शिक्षण, नोकरी इ. ..
(ई) ज्या व्यक्तीकरता प्रमाणपत्र पाहिजे त्याच्या जन्माचे गाव .. ..
(उ) प्राथमिक शाळेचे गाव व तालुका ..
(ऊ) माध्यमिक शाळेचे गाव व तालुका ..

(५) जातीचा पुरावा—
(अ) जन्म-मृत्यू रजिस्टरमधील उतारा ..
(ब) गावच्या ग्रामपंचायतीच्या आदिवासी सभासदाचा किंवा आदिवासी पोलीस पाटलाचा दाखला.
(क) शाळेच्या रजिस्टरमधील उतारा (अर्जदाराचा व वडिलांचा) किंवा शाळा सोडल्याचा दाखला.

अधिक माहिती—

(ड) त्याच्या जमातीचा नातेवाईक रहात असलेल्या ५ गावांची नावे व तहसील.

(इ) त्यांच्या कुलदैवतांची/जमात दैवतांची नांवे

(ई) दिनांक १० ऑगस्ट १९५० रोजी आपले कुटुंब रहात असलेल्या गावाचे नाव, तहसील व जिल्हा.

(६) अर्जदाराच्या आईवडिलांच्या मूळ गावाचे नाव, तहसील व जिल्हा.

(७) प्रमाणपत्र पाहिजे असलेल्या व्यक्तीच्या मूळ गावासंबंधी पुरावा (ग्रामपंचायतीच्या आदिवासी सदस्याचा दाखला).

(८) (अ) वडील किंवा जवळचे नातेवाईक यांनी जातीचे प्रमाणपत्र किंवा शासकीय सवलती घेतल्या आहेत काय ?

(ब) असल्यास त्यांच्या सेवा पुस्तिकेतील जातीच्या व मूळ गाव नोंदणीसंबंधी उतारा.

(९) (अ) जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी पूर्वी कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याकडे अर्ज केला होता का?
(महाराष्ट्र राज्यातील किंवा बाहेरील सक्षम अधिकारी धरून)

(ब) असल्यास कोणाकडे? केव्हा ?
(प्रमाणपत्राची सत्य प्रत जोडावी)

---

मी नोकरीच्या/शिक्षणाच्या किंवा इतर तात्पुरत्या कारणामुळे.................गावी रहात असून या गावाचा मी कायम रहिवासी आहे.

मी प्रतिज्ञेवर लिहून देतो की, वर दिलेली माहिती खरी आहे ती खोटी असल्याचे आढळून आल्यास मी भारतीय दंडविधान संहितेतील कलम १९९, २०० व १९३ (२) मधील तरतुदीनुसार तीन वर्षांच्या व दंडाच्या शिक्षेस पात्र होईन याची मला जाणीव आहे.

आपला,

(अर्जदाराची सही)

RSO- 1000/14/D-X/8396.
RISO-500/14/D-X/101297.